


म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
नों. दि.
वाचनालय
REFBK-0007474
REFBK-0007474

अनुक्रम..........
विभाग..........
क्रमांक..........
नों. दि. ......
वाचनालय

# लाटा-लहरी

१५५७८
अवाप्ति क्रमांक ३१०५
विषय १२८५
क्रमांक
दि. १५।७।५५
शाखा

प्रफुल्ल-दत्त

—प्रकाशक—

वामन विष्णु भट

**अभिनव प्रकाशन**

२२।३ अहमद सेलर बिल्डिंग

नायगांव, मुंबई १४

सर्वाधिकार लेखकाधीन

चित्रकार – गांगल

प्रथमावृत्ति मे १९५०

**किंमत एक रुपया**

—मुद्रक—

गणेश सदाशिव बैंदूर

**नवी दुनिया मुद्रणालय**

माधवदास पास्ता रोड,

दादर, मुंबई १४

REFBK-0007474
REFBK-0007474
अनुक्रम
क्रमांक
ता. क्र. 0868

यौवनीं घेतलें मन्दिर बान्धायाला,
शोधितां शिला, बान्धिता काळ हा सरला
यापुढें घालुनी घाव घणाचे केव्हां
मन्मनिंचा आणूं ईश मूर्तरूपाला

# किनाऱ्यावरून

आपल्या संकल्पांची जोपासना करण्याचें कार्य पुष्कळदां आपलें सुहृद्‌जन करीत असतात. माझ्या कांहीं मित्रांनीं वेळोवेळीं प्रोत्साहनपर सूचना केल्या म्हणूनच मी इतके दिवस या छंदांत रमलों.

भावगीताच्या तरलतेंत जसें माझें मन रमे, तसेंच विचार-विलासाच्या वलयांतही तें पूर्वींपासून रमे. पहिल्या पहिल्यानें लाटा-लहरींच्या या भाव-समाधींत एक वेगळ्याच प्रकारचा आनंद आहे असें मला जरी वाटत असे; तरी इतरांना त्या दाखविण्याचें माझ्या हातून झालें नाहीं. परंतु सत्यकथा आणि साहित्य या सारख्या 'रुचि' पूर्ण मासिकांनीं त्यांतील कांहींचा स्वीकार केला तेव्हां जीवनाच्या किनाऱ्यावरून पाहिलेल्या साऱ्याच लाटा-लहरी महाराष्ट्र-रसिकांना दिसाव्यात या हेतूनें मी त्या अनेक ठिकाणीं प्रसिद्ध केल्या. त्यांचेंच हें दर्शन आहे.

शिक्षकाच्या भूमिकेवरून प्रवृत्तीप्रमाणें अध्ययन आणि प्रतिभेप्रमाणें अध्यापन करतांना साहित्यांतील ज्या कल्पनांशीं मी एकजीव झालों त्यांतील एखाद दुसरी भाव-छटा या तांडव-तुषारांत कुणाला दिसेल. विशेषत: गुरुदेव टागोरांच्या वाङ्मयाचा आवडीनें अभ्यास करतांना तसें झालें असेल. किनाऱ्यावरून सहल करणाऱ्या मुशाफिराची पावलें कांहीं पडघमवर पडणाऱ्या टिपरीच्या तालावर पडत नाहींत. त्यांत विशेष प्रकारची गुंगी असते. त्याच गुंगींतून माझ्या ह्या लाटा-लहरींच्या दर्शनांत रसिक वाचक जरी घटकाभर रमला तरी मला समाधान होईल.

६–५–५०
दादर विद्या-मंदीर
मुंबई १४

प्रफुल्ल-दत्त

# लाटा लहरी

: १ :

ही घराघरांतुनि हंसते आज दिवाळी
दे जाणिव, 'झाली स्वप्नांची तव होळी.
धडपडती तरिही सांगे वेडी आशा
'मी रंगवीन या राखेंतुनि रांगोळी.'

: २ :

झोंपडया हवेल्या न्याहळीत भंवताली
तुडविलें तयानें चिखड पायाखालीं
तो वदला घुमतां अनुभव जिज्ञासूनें
'पेटली चहुंकडे मानवतेची होळी !'

: ३ :

मी असतां तेव्हां प्रणयगुंजनीं दंग
वाटलें आपुली राहिल प्रीति अभंग
करिं घेऊनि आतां शकलें आदर्शांचीं
वेडयापरि बघतों त्यांत तुझे भ्रूभंग.

: ४ :

यश संग्रामांतिल तोलुनि आजवरीचें
झुंझाराहि वदले, 'याचे कर सूर्याचे.'
हिरकणी प्रीतिची धरितां मजपुढतीं
'हृद्राग तयाचे,' वदले, 'इंद्र-धनूचे !'

अनुक्रम ९८०५६ विभाग क्रमांक नों. दि. शाखा

: ५ :

गायिके, आपुली आवर चढती तान
जाहले मनींचे सुप्त भाव उत्तान
शास्त्रोक्त कलेंतिल पुरे तुझे सा-रे -ग ऽ
जाणणें मुक्यानें आतां उरलें गान.

: ६ :

" अधरींचा मधुरस एकदांच मजला दे !
ब्रह्मांड नादविन मग मी कीर्ति-निनादें "
विनवून म्हणाली तुज मत्प्रीती धुन्द
पहिलाच स्पर्श बेताल करी मज स्वादें.

: ७ :

घेऊन शशांका रविचें उसनें तेज
अंधारीं करिसी तारांशी हितगूज
तो उमाळ्यावरी येतां सरते क्रीडा
चोरट्या पाउला करि चाहूल सलज्ज.

: ८ :

' करकरून बसले कंचुकिचे हे कांठ
ये प्रियंवदे ! तूं उकल मारिली गांठ '
' हा दोष न माझा, तुझाच गे मुनिकन्ये
तव यौवन व्यापी क्षणाक्षणा नव प्रांत.'

: ९ :

दाहिंवरला सारा परिसर शीतलतेनें
मी उभी गवाक्षीं; थरथरत्या अधरानें
साथीस्तव बघती वाट हृदयिंचे बोल
एकलें खुले नच हेमंताचें गाणें.

: १० :

जरि निसर्ग फुलवी नकळत तुजसी मुग्धे
पूर्णत्व यौवना परि ये प्रीति-सुगंधें
स्पर्शील तुला जो जाणुनि हृत्-सौंदर्य
आणील तुझ्यास्तव स्वर्ग तोच अनुराधे.

: ११ :

लिहिलीं जीं तुझिया प्रीतीच्या झरणींनीं
तेवढींच माझीं आवडतीं गे गाणीं
ध्वन्यर्थ कळो वा कुणा कळो न तयांचा
तीं स्फुरलीं अपुल्या जीवन अनुभूतींनीं.

: १२ :

आलास आजवर व्यसनांतुनि ताराया
ये आज तसाही दारीं भाऊराया
लावुं दे बिजेची तुझिया भालीं कोर
पथ तिमिरांतिल हा घटकाभर उजळाया

: १३ :

मुद्रिकेंत तुझिया पाहियलें मम नाम
जीवनीं नकोशा क्षणभर दिसला राम
असतील अक्षरें तींच जरी हृदयांत
समजेन जिवाचें अक्षर तेंच इनाम.

: १४ :

स्मृति-वलयीं तुझिया रमतां मन अनुरागें
एकाग्र होउ ी अवकाशांत तरंगे
न्याहळितों तेथुनि विश्वाचे व्यापार
उकलितों आणखी भवितव्याचे धागे

: १५ :

यायचें मरण जरि असेल मज एकाकी
येउं दे; रुबाया स्फुरतां तुझिया अंकीं
ओतीन प्रीतिचें मद्य आपुल्या तींत
प्राशितां स्मरण मम होइल घटको-घटकीं

: १६ :

ह्या कल्प-तरूच्या मुग्धमधुर छायेंत
मत्हृदय—सारिके गा जीवन-संगीत
आतपें उद्यां हा जातां जळुनि फुलोरा
ओतितां न येतिल भाव प्रीतिचे त्यांत.

: १७ :

शैशवीं हंसे मन कुणाकडेहि बघून
यौवनीं बसे तें शोधित अपुलें न्यून
व्यक्तित्व ठसविण्या वांछितसे प्रौढत्वीं
ग्रासितां जरा त्या भासे जीवन शून्य.

: १८ :

नव-निर्मितींत जो भोगितसे आनंद
तो कलावंत राहतो अहर्निश धुन्द
नव-क्षितिजें जिंकित वाऱ्यावरति विहंग
विहरतां विस्मरे विश्वांतिल निर्बंध.

: १९ :

येणार सुधाकर स्वर्ग धरेचा लाल
तारका अप्सरा म्हणुनी होति विलोल
नाचतां काय रजनीच्या नील-महालीं
गुंगींत गळाले हिरे पैंजणांतील.

: २० :

बेहोषपणें लोटितां प्रवाही नौका
मरणाची हृदया क्षणहि न शिवली शंका
साहसास माझ्या कारण तूं होतीस
कवळाया आतां मृत्युच मारी हांका.

: २१ :

वाचनालयीं वाचिले कितितरी ग्रंथ
विद्वान म्हणुनि मिरविलें चारचौघांत
दरि पुसतां माझा बाळ प्रश्न एखादा
ये कळुनि किती विज्ञान-विश्व अज्ञात.

: २२ :

पसरुनी मोहमय जदूचें करजाल
स्वप्नाळू करि जग चंद्रतारका लोल
आवरून त्याचें-विरल धुक्याचें-वस्त्र
करि कार्यक्षम रवि, जागवून भूगोल.

: २३ :

" प्राशून मद्य हा रोज असे बेहोष "
जनतेचा होता हाच तयावर रोष
धुंदींत परी जें लिहुनि ठेविलें त्यानें
देतात महात्मे तोच जनां संदेश !

: २४ :

कळला न कुणाही आकाशाचा अंत
का चंचलतेला कळतें हृदय अनंत ?
मार्तंड-शरें परि विव्हळ होतां धरणी
ओथंबुनि, स्रवुनी ये तें जळ धारांत !

अनुक्रम १८५६६
विभाग
क्रमांक ९२०५
नों. दि.

: २५ :

वानिलें तुझें सौंदर्य कितीनीं प्रमदे
वाचिलें आणि तें कितिकांनीं अल्हादें
भ्रूलता जेधवां लवति तुझ्या अश्रूंनीं
त्या करुण-विलासीं शांति मना मम लाधे.

: २६ :

" सस्यमयी सुफलां अमुची भारतमाता "
संपली सभा ह्या गाउनि परिचित गीता
श्रोत्यांतुनि आले शब्द कुठुनसे कानीं
" अर्थाविण अजुना पढतों आम्हीं गीता. "

: २७ :

जा ! गाउं नको तव गीत इथें चंदेरी
मत्प्रीत जगाहुनि का तुज वाटे प्यारी ?
पीयूष-कलश हें अमोल ओतुनि येथें
मजसाठीं सखया होउं नकोस भिकारी.

: २८ :

येणार समीप न कधीं कधींही दोघे
गुंफितें तरी मन आपुलकीचे धागे
प्रीतिची शाल ही राहियली जरि अपुरी
तरि तिनेंच भूषव मम आशांचें थडगें.

: २९ :

गाऊन सारखीं कवनें प्रक्षोभाचीं
उसळविल्या त्यानें जनता-सागर वीची
संहार किनाऱ्यावरला पाहुनि आज
अंतर्मुख झाली क्षणांत वृत्ति तयाची.

: ३० :

राहवे न म्हणुनि, लिहिली रोज तयानीं
हळुवारकरें अश्रूंची करुण कहाणी
बरळलें; रंगलें रसिक-राज मधु-पानीं
द्या फेकून; जगता नकोत हीं रडगाणीं.

: ३१ :

ह्या ब्रह्माण्डांतिल प्राशिलेंस तूं वीषा
लाभलें तयाचें तुजसी मोल गिरीशा
सोसुनी जन्मभर हालाहलसम क्लेश
दृश्यरूप होति न कितिकांच्या पार आशा

: ३२ :

मन्मना कुठेही क्षणभर घे विश्रांती
यावया श्रांत गात्रांस तुझ्या नवकांती
उद्युक्त हो परी फिरुनी विश्व-प्रवासा
अंतींच तुला लाभेल चिरंतन शांती

: ३३ :

दिनरातहि ज्याला जनसेवेची आस
वर्तमान योजी हा नित सत्कार्यास
प्राशितो जरी तो हालाहल इहलोकीं
पंखांवरि नेइल कीर्ति तया स्वर्गास

: ३४ :

जाणतें पुरें जग; तुझें नि माझें नातें
मी कलावंत सौंदर्यवती तूं हें तें
रंगल्या दशदिशा अपुल्या कीर्ति-परागें
स्वर्गीय प्रेमही असुयेनें काजळतें

: ३५ :

बोललों बोल जे तुजशीं चार जणांत
पडसाद तयाचे विरले अवकाशांत
अव्यक्त परंतू राहियलें हृदयीं जें
गुपित तें चोरुनी ऐकितसे एकान्त

: ३६ :

विसरसी जेधवा मना तुझें अस्तित्व
तेव्हांच मिळे तुज नूतन जीवन-तत्त्व
खेळते झपूर्झा नित्य जिथे अनुभूती
पाहतें तिथें जग वेगळेंच व्यक्तित्व

: ३७ :

कविराया, अपुलीं गा ओजस्वी गाणीं
अवकाश भरूं दे, तुझिया नव-गीतांनी
पडसाद तयांचे उठतां दिक्कोनांत
भवितव्य तुझें ही उद्गारिल जनवाणी

: ३८ :

शोषून जलधरा उदधीचें सामर्थ्य
अंबरी निनादत गाजविसी पुरुषार्थ
तव वैभव पाहुनी वाटे तप्त धरेला
' हृत-शमन कराया माझें, हाच समर्थ '

: ३९ :

कितिदां तूं येतां माझ्या सहज समीप
वाटलें वहावें तुज हें जीवित-पुष्प
बोंचली नको ती एकच हृदया शंका
' सौंदर्य मनोज्ञ, नसेल मम अनुरूप '

: ४० :

मन भवितव्याच्या रमतां कधिं सहलींत
आशेच्या झुळुकी येति तया फुलवीत
घालित भुरळ तरळतें स्वप्न एखादें
अन् दृष्टिपथांतुनि जातां होइ सचिन्त

: ४१ :

किती भुलुनि तयाच्या शुभ्र हंससम वेषा
भजनांत रंगलें कीं हा पांढरपेशा
भलत्याच ठिकाणीं पाहुनि त्या अपरात्रीं
उशिराच, परन्तू कळला त्याचा पेशा

: ४२ :

गोपाळ घ्या कुणी, घ्या हो कुणि गोविंद
ओसंडत होता माजघरांतुनि मोद
बैसली कुणितरी निपुत्रिका बाजूला
तिज यावी कैसी अव्यक्तांतिल साद ?

: ४३ :

अन्थरून त्यानें मार्गी अपुल्या कांटे
पान्थस्थां नेउनि सोडियलें सत्पंथें
जाहली तयाच्या खिळे ठोक तरि माथीं
संतांचें जीवन जगाहून उफराटें

: ४४ :

लावून गन्ध अक्षता, वाहुनी सुमनें
मी तुझी आरती केली उत्साहानें
त्या ब्रह्मसमाधीमधुनी येतां जाग
माझ्याच भक्तिचें ऐकियलें मी गाणें

: ४५ :

कसल्यातरिं धुंदींत करितो मानव पाप
क्षण ओसरतां त्या होई पश्चात्ताप
मिळवाया फिरुनी समाधान सुख-शांति
दगडांतहि पाही परमेशाचें रूप

: ४६ :

तारका न ह्या, हीं स्वप्नें निशिकान्ताचीं
वसुधेच्या विरहें व्याकुळल्या जीवाचीं
नावडे तिजसि हा प्रियकर परि स्वप्नाळू
गुंगवी गिरकवी प्रतिभा तिज सूर्याची

: ४७ :

लिहिलेंस विधात्या एकच तूं हें गीत
तारका-ग्रहांच्या तेजस्वी शब्दांत
वाचितां प्रत्यही तिमिरीं त एकान्तीं
वेगळा तयांतुनी होई भाव प्रतीत

: ४८ :

जग कधींच निजलें वसुधेच्या पर्यंकीं
चल अखेरचा दे मधुप्याला मज साकी
गुंगींत निशेच्या माझा ' मी ' विसरेन
राहील राहुं दे; शून्यच मागे बाकी

: ४९ :

तेवविल्या स्मृतिनें तुझ्या स्नेह-ज्योतींत
अंतर्मुख माझें बघतो चित्त व्यथीत
मालवितां परि त्या ज्योती व्यवहारानें
धडपडतो हृदया शोधाया तिमिरांत

: ५० :

अनुभवितां जीवन साहिन जे जे क्लेश
राहतील त्यांचें कवितेंतुनि अवशेष
आदळते विरते लाट किनाऱ्यावरती
घन-रूप उरे उन्मेष उरींचा फेस

: ५१ :

येणार आज ह्या बाजूनें सम्राट
वाढला म्हणुनि हा हमरस्त्याचा थाट
लोटलें पहाया सम्राटा जग सारें
घे मानवतेची चाहुल पाउल-वाट

: ५२ :

क्षितिजावर स्थिरतां नजर सांज-समयास
ही उदासीनता व्यापितसे हृदयास
भूवरिं ये प्रतिभा चढत्या चंडोलाची
मिसळीत हवेमाधें मुक्या मनाचे श्वास

: ५३ :

रवि उकलि पाकळ्या ओतुनि तेजोराशी
कवटाळी नलिनी तरि मधुपा हृदयाशी
जाणिते रसिकता हृदय कलावंताचें
स्वामिनी नव्हे; स्त्री ललित-कलेची दासी

: ५४ :

समजुनी न घेतां अंतरिंचा भावार्थ
नयनांत शोधिते प्रीती अपुला स्वार्थ
परि विलीन होई भक्ती मानवतेंत
सेवुनी मूर्तिच्या पद-कमलाचें तीर्थ

: ५५ :

श्रोत्यांस पढविण्या नव्या जगाची नीती
किति स्रवली त्याची वेगानें रसवंती
मंद--धी परतलें तसेंच ते माघारी
आकंठ भरे नच कधिंही कलश प्रपातीं

: ५६ :

वीरांनीं होता, तदा सिद्ध युद्धार्थ
गाजविला ' हर हर ' शब्दीं किति पुरुषार्थ
ते बोल प्रयोजन समयीं ऐकुनि, वाटे
काळही फिरवितो हवातसा शब्दार्थ

: ५७ :

अस्मान बोलवी वर वर मानव-ध्येया
विसरून पिपासा भूक आणखी काया
जातांना वरि ते; बोले हळुंच जमीन
ये कधिंहि, आसरा देइन मम वक्षीं या

: ५८ :

लववूं न शके ज्या वृक्षा झंझावात
खेळवी खेळण्यासम त्या गज लीलेंत
हेमंत ऋतूमधिं सांचुनिया पाचोळा
खंदकांत त्याचा रुतुनी होई अन्त

: ५९ :

एकदांच होतां वर्षाऋतुचा स्पर्श
तो निर्झर झाला स्वर्गाला आदर्श
ग्रीष्मांत तडकुनी होतां हृदय विदीर्ण
कुणि पाहि न त्याचें भग्नस्वरूप हताश

: ६० :

भांडार जयाचें मोत्यांचें नवलाख
जो विश्वाचीही शमन करितसे भूक
तो सागर, त्याचा पुत्र शंख कोठेही
भिक्षेस्तव फिरतो, चर्चुनि अंगीं राख

: ६१ :

माझिया गृहीं ये अथवा येउं नकोस
तिळही न तयाचा तुझ्यावरी मम रोष
अवशेष स्मृतीचें तरळत जोंवरि हृदयीं
करितील सदा मम काव्याचा परिपोष

: ६२ :

सोन्याची काया लाभे जरि विहगास
अस्माना भिडण्या घेइल कां तो ध्यास ?
निस्तेज करी मन सुख-सुमनांची शय्या
उड्डाणावांचुनी कोठुनि विश्व-विकास

: ६३ :

माझेपण ओतुनि करितां तूं गृहकार्यें
सौंदर्य दिसुनि ये तुझे तेधवां आर्ये !
लालित्य खेळते घरभरल्या आनंदीं
मानसांत हंसी जेवि निर्मिते वलयें

: ६४ :

" गर्जला अखेरी भक्तांचा मेळावा
क्षणभरी तरी दे दर्शन आम्हां देवा ! "
उंबऱ्यांत हरिजन कण्हला, " देव न येथें
करि जोंवरि मानव बंधु-बंधुचा हेवा

[stamp]

: ६५ :

शिशिरानें होसी कंपित काय मृणाला ?
मुग्धेसहि छळिती अशाच गे खल-लीला
विकसत्या दलां तव सुखवित मधु-लहरीनें
येईल प्रियसखा वसंत फुलवायाला

: ६६ :

" दशादिशा धुंडिल्या थकलें घालुनि साद
ये ! अतांतरी ये ! ऐकुनि आर्त निनाद "
" कां फिरसी वणवण, करुनि तनूची लाही
मी तुझ्याच हृदयीं घेत रमे आस्वाद "

: ६७ :

साक्षीस ठेउनी वेदामधलें सूत्र
आणिती उपाध्यें देह दोन एकत्र
लौकिकें जाहलें सखया जरि दुसऱ्यांची
मम कंठिं मुकुंदा तुझेंच मंगल--सूत्र

: ६८ :

आघात प्रत्यही झेलुनि जीवन-कलहीं
जाहली रक्त-बंबाळ आज काया ही
कधिं कधीं वेदना असह्य होतां माझ्या
शुंगींत तुझ्या प्रीतिच्या पडुनि मी राही

: ६९ :

मानवी-मन कधीं येतां संत समीप
करि खुलें आपुलें बन्धन आपोआप
चुम्बिते जेधवां गिरिशिखरा घनमाला
निमिषांत होतसे हृदय तिचें द्रवरूप

: ७० :

ओलांडुनि जातां ध्येय-पथांतिल आग
उसळलें कितीदां तींतुन अग्नि-पराग
हुंकार कुणितरी दिधला घन-तिमिरांत
" घटकाभर आणिक मुशाफिरा चल जाग !"

: ७१ :

नवरंग जमवुनी अंतरिंचे मेघांच्या
रवि प्रतिभा रेखी काय उषा-संध्येच्या ?
जुळली न संगती आवडत्या रंगांची
भ्रमतसे म्हणुनि हा चिंतनांत प्रेमाच्या

: ७२ :

उड्डाण येथुनी चल घे मानस-हंसा
दूराविल तुझिया ध्येया प्रीति-पिपासा
उल्लंघुनि येतां धवल-गिरीचें सानू
यश तुझें भूषविल येथिल कमल-निवासा

: ७३ :

कल्पना चितारी मनीं हवे ते दृश्य
प्रतिबिंबित होई अपुलें ज्यांत भविष्य
उपहासे सांगे सत्य जगा, " हा भास
कधिं येइ न हातीं धरिता इन्द्र-धनुष्य "

: ७४ :

पूजनास तुझिया अशीच देवि यशोदे
मम हृदयिं अहर्निश भाव-सुमें उमलूं दे
वेंचिल्या फुलांची तुला वाहतां माला
दरवळुनी जाइल मानस, तव सौगंधे

: ७५ :

बाल्यासह सरलें अंतरिंचें चांचल्य
वाढत्या उरींचें मानस-सरस सखोल
आकळे न मधुपा तरत्या कमळावरल्या
किति रुतलें मुग्धे; खोल तयाचें मूळ

: ७६ :

घटकाभर ओती तेज बिजेची कोर
तरि जगे त्यावरी दिनभर आर्त चकोर
तव अधरीं स्रवलें प्राशुनि कधिं मधु-बिंदू
दिन-मास विसरतो हृदयीं जडला घोर

: ७७ :

गाऊन आपुलें करुण-भाव-युत गान
ठेविलीस स्कंधीं विश्वासास्तव मान
आश्वासन देतां तुला मूक हुंकारें
वदलीस, " लाभलें आज खरें वर-दान

: ७८ :

चिरकाल रहावी अमूर्त प्रीति विशाल
बांधिला शहानें म्हणुनी ताज-महाल
खोदिलें जयांनीं अमर परी तें शिल्प
स्वप्नींहि न घेई नांव तयांचें काळ

: ७९ :

होणार जिवाचा विनाश आसक्तींत
मन वेडे तरिही सोडि न अपुला हेत
निमिषांत ज्योत ही करिल जिवाची रक्षा
जाणूनिहि ओढी पतंग अपुला अंत

: ८०:

उध्वस्त गडाच्या पडक्या बुरुजावरुनी
गायिले कितीदां भग्न मनोरथ गानीं
परिसतां आज ते येथें कोकिल कंठीं
चैतन्य खेळते गात्रागात्रांमधुनी

: ८१ :

आलीस फिराया सहज किनाऱ्यावरती
अन् नकळत आली हृदया माझ्या भरती
चांद्रिके ! परंतू अक्षय ना तव प्रीति
" ये भरतीमागुनि सुकती " सांगे नियती

: ८२ :

प्रीतला आपुल्या नच कसलेही बन्ध
लालित्य असावे जीवनांत निर्बन्ध
होतसे सुशोभित सुमनें जरि फुलदाणी
कक्षेंतच त्यांचा दरवळेल सौगंध

: ८३ :

घटकाभर बोलुनि खुल्या दिलानें जातां "
तूं सुचविलेस मज " जाते हं मी आतां
अधरींच राहिले शद्ब परंतू माझे
सौंदर्यशालिनी ! चरण तुझे न्याहळितां.

: ८४ :

जीवीत-रथाचें करतां तूं सारथ्य
ये पदोपदीं प्रत्यया तुझें सामर्थ्य
अस्तित्व जरी हे राहिल चिर-संग्रामीं
होईल शौर्यमय जीवन माझे सार्थ.

: ८५ :

रवि पिता तुझा अन् माता वसुधामाई
म्हणुनीच जलधरा कांति तुला लाधे ही
क्षितिजावर येतां उभवित इंद्र-धनू तूं
नाशती दूरितें सकलांची लवलाही.

: ८६ :

हा काल रेखितो आज उद्यांचें स्वप्न
असतील मनींचे भाव ज्यांत संलग्न
परि सरुनी जातां अनुभूतीचे राग
करि प्रतिभा अपुरी आणि जिवा बेचैन.

: ८७ :

वात्सल्य वीर शृंगार करुण तव हृदयीं
स्थळ-काळ परत्वें स्वच्छंदानें वाही
म्हणुनीच गमे; जग 'रमणी' तुज संबोधी
जी रमवि अपुल्या लालित्यें वसुधा ही

: ८८ :

जन-हृदयीं शोधुनी सगुणांचें अवशेष
गवसला जयाला जगत्-जीवनीं ईश
तो चढतां चढणी संकल्पित ध्येयाच्या
विश्रमतां होइल; घडिभरही न हताश

: ८९ :

कौतुकें उजळते जीवन तुमचे-अमुचें
अंगार फुंकिता ज्योत तयांतुनि नाचे
इहलोक जागतो उसन्या स्फूर्तीवरती
स्वर्गांत स्वयंभू परि ते ग्रह-गोलांचे

: ९० :

होउनी शुचिर्भुत शीतल शशि-किरणांनीं
ही धरा डोलवी चराचरा मधु-कवनीं
स्मरणांत नाचतां घटका क्षण दुःखाचे
अश्रूंत रंगवी अपुली करुण कहाणी

: ९१ :

वदलीस तेधवां " होशिल का तूं माझा ? "
बोललों " प्रीतिला खुला न हा दरवाजा "
मेनके, तपस्या तुझ्या दर्शनें भंगे
मी तुझ्या जिवाचा, नच विश्वाचा, राजा

: ९२ :

निर्मिलेस ना तूं ग्रह-तारांचे दीप ?
वसुधेचें आणिक तेजःपुंज स्वरूप ?
तम उजळाया कां तुझिया भंवतालीचा
वाटतो हवासा नंदा-दीप समीप ?

: ९३ :

गुंफितां आपुली कवनीं अनुपम प्रीति
लाभली जिवाला अननुभूत सुख-शांती
परिमळे परंतू स्मृति-सुमनांची माला
करितसे जिवाचा दाह आज एकांती

: ९४ :

रसरसलें यौवन ओथंबुनि हे सारे
लावण्यलते तूं लवसी कुच-फलभारें
जरि लपसी आवरणांत पुष्प-पर्णांच्या
कुणि विहंग आतां जाइल कां परभारे ?

: ९५ :

वेंचिले जयानीं घटका-पळ परमार्थी
तुकयाचा इंद्रायणींत तरला गाथा
जा ! तरेल, फेकुनि द्या कुठल्याही डोहीं
अनुभूतींतुनि जी छंदमयी हो कविता

: ९६ :

सेवून सुधा तव स्वप्नमयी निशिनाथा
राहिलो रात्रभर लिहित प्रीतिची गाथा
तूं जातां, अलिखित चरण राहिले कांहीं
हो असाच स्फूर्तिप्रद तूं प्रतिभावंतां

: ९७ :

आळवून माझे भाव-गीत नवरागीं
ठेविलेस मज तूं डोलत स्वप्न-तरंगीं
शून्यांत मिसळतां नाद नभोवाणीचें
जाहली फिरुनि मम जागी वृत्ति विरागी

: ९८ :

भिरभिरसि विहंगा हवा तसा असमानीं
झुळझुळत्या वाऱ्यावरि आलापित गाणीं
तापलें आतपें घरटें पृथ्वीवरलें
विसरसी जीवन म्हणुनी कां मधु-गानीं ?

: ९९ :

अनुभूती-ज्वालेंतून उसळतां सत्य
घेतलें लिहाया करिं लेखन-साहित्य
झरणींतुन झरतां अविरत भाव मनींचें
प्रकटलें निळ्या शाईंत सहज लालित्य

: १०० :

प्रतिदिनीं उमलते वेलीवर नव फूल
कवि-हृदय विकसवी क्षणाक्षणा नव बोल
तुजजवळि विधात्या असुनी कल्पकता ती
कां दाविसि आम्हां तेच तेच ग्रह-गोल ?

: १०१ :

ये प्रतिभे उजळित चराचरांची सृष्टी
स्फूर्ति तूं तेज ते नाचवीत ये ओठीं
हृत्भाव; कल्पना ओतितील छंदांत
वैशिष्ट्य व्यक्तविल त्यांतिल मम अनुभूती

: १०२ :

मम जीवन असुं दे होमकुंड धगधगते
बेचीन प्रसंगी प्राणहि फुलवाया ते
रक्षेंत सांठला आकांक्षेचा अंत
जाणितो तरीहि न वाटे खंत मनातें

: १०३ :

पुशिलेंस मला तूं " प्रीति कशास म्हणाल ?
लाभतां तुम्हां ती मोल कशाचें द्याल ? "
" जीवाचें दिधलें दान व्हावया माझी--
जी दो हृदयामधिं धरित एकच ताल "

: १०४ :

" जग जिंकुनी ये करपाशीं श्रमपरिहारा
कर्तव्य प्रीतिहुनि अंतीं श्रेष्ठ उदारा "
गूढार्थ वाचुनी हाच तुझ्या नयनीं, मी
घे आलों अच्युत राहुनि तुझिया दारा

: १०५ :

आसमन्त भरलें ज्यांच्या सौगन्धानीं
सुविचार फुलविले मी ते मम अश्रूनीं
तृण उदंड उगवे सहजी वर्षाकालीं
हो सस्यमयी परि उद्यमेंच ही धरणी

: १०६ :

तिमिरांत जातसे काळ न हा मम वाया
शांतता अशी ही हवी मना विकसाया
उत्फुल्ल प्रभाती होतां दल-संभार
येतील थवे मधुपांचे रस सेवाया

: १०७ :

" लिहितोस कशाला मजवरती हे काव्य
याहुनी वेगळे असो तुजपुढें दिव्य "
" तूं सांगु नको मज आज तरी हे बोल
प्रतिबिंबित होइल यांतच मम भवितव्य "

: १०८ :

प्रीतिच्या दरींतुन जीवन पाझरते जे
त्यावरी मुशाफिर मन हे तरते माझे
आकंठ जरी जल मिळे न ते प्राशाया
माधुर्य तयांतिल फुलवी क्षण नवतेजें

: १०९ :

विसराया तुज मी फिरतो रानोमाळ
माध्यान्हि अवेळीं कधिंही सांजसकाळ
फुंकरिति निखारे परी निशेची स्वप्नें
जाळितो देह, भडकल्या उरींचा जाळ

: ११० :

मधुपानीं सरलें आयुष्यांतिल वर्ष
तरि जीवित-पेयांतून उसळतो हर्ष
सालगिरा साजरा करितां औदार्यानें
करि जरा भंवतिच्या मानवतेला स्पर्श

: १११ :

वलयांकित करुनी तुज अपुल्या लहरीनें
आलिंगुनि चुंबुनि सांगे सागर स्वप्नें
सांभाळ परी ते नौके हृद्‌गत पोटीं
स्पर्शितां किनारा प्रस्फुरशिल हर्षानें

: ११२ :

नवविचार येतां नाचत दृष्टि-पथांत
कल्पना मनांतिल धावयास ये साथ
भावना वाजवी अधराचें अल्गूज
त्या ब्रह्मानंदीं स्फुरे हृदय कवितेंत

अनुक्रम ९७५८९
विभाग
क्रमांक
नों. दि.

: ११३ :

फलभारें लवसी वसंतसमयिं रसाला
शाखाग्रीं करिती कूजन कोकिल-माला
आरती जरी त्या करिती सत् हृदयाची
काव काव करिती सेवुनि काक रसाला

: ११४ :

कशि रमसी माझ्या कविता-स्वर-संवादीं
ती राख जिवाच्या होत्या जळत्या व्याधी
श्रद्धेनें विभुती लाव हवी तर भालीं
दिव्यत्व जाण परि बांधु नकोस समाधी

: ११५ :

प्रतिभेची त्याच्या एकच होती धाव
अस्मानीं गुंफिन ग्रह-तारांनीं नांव
प्रतिभेस परंतू कधिं न भेटली स्फूर्ति
व्यक्तवी आज तो म्हणुनि कुठेतरि भाव

: ११६ :

लीलेंत आज जे झेली झंझावात
मंदिर ते खंबिर असे खरे पायांत
भक्तांची खिळते दृष्टी कळसावरती
परि घाव घणांचे शीलांच्या हृदयांत

: ११७ :

स्त्री-सौंदर्या तव दर्शनही मायावी
दृक्क्षेपें तुझिया ढळले संत तपस्वी
जाहलें परी ते सुखद कलावंतास
रंजविली ज्यांनीं प्रतिभेनें त्या पृथ्वी

: ११८ :

तरळसी विचारीं जलदा कां ह्या व्योमीं ?
" क्षणभंगुर जीवन योजुं कुणाच्या कामी ? "
औदार्य नियोजी स्थान तुझे अस्मानीं
मानास्तव गर्जे इथें जगाचा स्वामी.

: ११९ :

कधिं शांत होउनी मन्मन जनसंमर्दी
हें जीवन जगतां, मूल्य तयांतिल शोधी
उठवितां अंतरीं वादळ कधिं एकान्त
आवरितां येइ न अविचारांची गर्दी

: १२० :

जन्माचा जडला जया कलेचा छन्द
तो लुटितो एकांतांत खरा आनन्द
कमलांच्या कोषीं स्वयें कोण्डुनी काया
गुंजारव करितां मधुप होतसे गुंग

: १२१ :

वैतागुनि सोडुनि संसारींचें भाग्य
वरियेलें तयानें जन्माचें वैराग्य
कुणि येतां रमणी मागाया वर-दान
तो वदला, "लाभो अखंड तुज सौभाग्य"

: १२२ :

राहिला उभा ढग एकलाच दिक्कोनीं
मुनि जेंवि तपस्या करितो निर्जन रानीं
अंधाऱ्या रात्रीं तिळही नच ढळला तो
त्या तेजाळित ये प्रकाश नव-किरणांनीं

: १२३ :

रंगला कन्हैया कुंजवनीं गोपींत
लुटियलें तयांच्या कुंभांतिल नवनीत
नाचला परंतू तोंच कालिया-शीर्षीं
करि प्रीत जगाची पराक्रमा उत्स्फूर्त

: १२४ :

घेतसे कधीं तव विश्रांतीस्तव अंक
एकुनि मजविषयीं होती जन साशंक
न्हाणितो परि जो वसुधा पीयूषानें
कुणि न्याहळी न त्या चंद्रावरिल कलंक

: १२५ :

अभ्यासुनि तुझिया प्रीतिचेंच सिद्धांत
रचियला, ठेविला जगापुढें नव-ग्रंथ
ते वदले, "लिहिलें लिहिल असे ना कोणी"
त्या सांगु कसे मी तुझ्यामुळें यशवन्त"

: १२६ :

स्वप्नांचें गुंफुनि अपुल्य.भवती जाल
मन जीवन-कलहीं राही धुन्द खुशाल
झुंजता तयाचें तुटुनी दुबळे धागे
बैसतो जिव्हारी घाव, होइ घायाळ

: १२७ :

हा मानव निर्मिल भूवारें अपुल्या स्वर्ग
या हेतुनेंच दे जीवन त्यास निसर्ग
स्वार्थांध परंतू होतां मन मायेनें
बन्धूसहि दे तो असुरासम उपसर्ग

: १२८ :

तूं माळिण प्रतिभे, फुले तुझा हा बाग
जिंकिला फुलांनीं यांतिल तव गे राग
चिंतनीं गुंगुनी व्यर्थ अतां शून्याच्या
ये विश्वावरती उधळित पुष्प-पराग

: १२९ :

वाढत्या वयाचा सांगे क्षण एकेक
' ध्येयाची प्रतिमा काळ-शिलेवरि रेख '
अंतर्मुख मन हें म्हणतें, " स्वस्थ रहा तूं
होईल उद्यांच्या उदरीं तियेची राख "

: १३० :

घे दीर्घप्रयत्नें साधुनि अपुलें ध्येय
जागीं बलवन्तांही यत्नाविण ना श्रेय
नच मिळे हवें तें, सहसा स्वप्नाळूंना
रे दैवाहातीं दुबळ्यांचें भवितव्य

: १३१ :

भुलविते मानवा कांता-कांचन-कीर्ति
बेचैन करी मन त्यावरली आसक्ती
" निष्काम असे हें माझें जीवित-कार्य "
संतही न वदले गिरि-कुहरीं एकांतीं

: १३२ :

गुंतसी मना तूं कसल्या तरि व्यापारीं
फसशील परी ह्या स्वार्थाच्या बाजारीं
मिळणार न तुजला देउनि मोल हवें तें
व्यवहारें भरली येथिल दुनिया सारी

: १३३ :

ओथंबुनि ये हा मेघ शिरावरि तुझिया
पथ आक्रमीत चल त्वरित अतां खगराया
मज तरी दिसे हा प्रलय-कालिंचा मेघ
जो दूरवील तव अनंतांतल्या ध्येया

: १३४ :

आचरण सिंचुनी अपुलें आपुलकीनें
जो रंगवि अपुलीं विचार-वलयीं स्वप्नें
समरूप तयाचें होतें चित्त कुठेंही
त्या आत्म-विकासा नकोत पूजा-स्थानें

: १३५ :

रसभरित कथा वाचुनी कल्पनेंतील
जाहला अनावर तिच्या मनाचा तोल
वाटलें तिला, "मज विभव असें लाभावें"
शृंगार भूषवी आज तिचा, घरकूल

: १३६ :

पोटास्तव जग हें दिनभर वणवण धावे
श्रमतां तें रजनी तुझ्या कुशींत विसावे
परिसून रातभर त्याची करुण कहाणी
कां दंव-बिंदूंनीं ऊर तुझें ओलावे ?

: १३७ :

मन उदासवाणें असतां एकान्तांत
प्रीतिचें आपुल्या विरचित बैसें गीत
उल्हसीत होतां फिरुनि कधीं गातां तें
करि अवगाहन मन क्षणभर स्वर्गांत

: १३८ :

यंत्रांची घरघर ऐकुनि दिवसाराती
ढळली मजुराची त्या, आत्म्याची शांती
संभ्रमांत असतां आणिक एकदिनीं तो
लाभली तयाला यंत्रांतच विश्रांती

: १३९ :

सखि-स्वप्न आपुलें गुंफित शशि-किरणांत
मम प्रतिभा होती एकांतामधिं गात
अपुरेच राहतां धागे प्रातः काळीं
उत्स्फूर्त गीत तें अडखळलें अधरांत

: १४० :

टेकितां तुझ्या मी वक्षावरती मान
प्रतिभेनें माझ्या व्यापियलें अस्मान
रात्रीसह सरलें स्वप्नांचें रंजन तें
अंथरिते आतां आग पदीं माध्यान्ह

: १४१ :

असहाय तपें धरणीचें फुटतां ऊर
तरळत्या घनांचा काळवंडला नूर
अवतरलें खालीं हृदय तिचें शमवाया
चंचलही जाणी कामिनिचें काहूर

: १४२ :

" हृदयांत माझिया स्वर्गाचें प्रतिबिंब "
दर्पांत म्हणाला तारकेस दंव-थेंब
ती वदली सोडुनि जातां गगन-महाला
" उदयाचालीं येईल, थांब जरा, रविबिंब "

: १४३ :

गिरिपाशीं अपुलें करुनी जल स्वाधीन
निमिषांत होतसे गगनीं मेघ विलीन
खेळवून त्याचें जागोजागीं पाट
गिरि सहज मिळवितो औदार्याचा मान

: १४४ :

" माझ्याच पित्यानीं बांधियला हा वाडा "
मजुरांचा वदला पुत्र उपाशी उघडा
कुणितरी वाहनांतून उतरुनी खाली
खेकसलें, " चल हो, दूर येथुनी, वेडा ! "

: १४५ :

गिरि-शिखरीं करितां तूं वर्षाव पयोदा !
उल्लंघुनि वाहे सरिता तट-मर्यादा
अभिषेक तेंवि तव होतां प्रीति-सुधेचा
क्षणही न जुमानी वाणी अधर-विरोधा

: १४६ :

विश्वस्त होउनी, रमतां तव सहवासीं
कुरवाळित मजला घेतलेस हृदयाशीं
पाहिलें लोचनीं परस्परांचें रूप
यावांचुनि प्रेमा हव्या कुणाच्या साक्षी ?

: १४७ :

कधिं थकुनी जातां करितां जीवित-कार्य
मन उल्हसीत करी तुझेंच स्मृति-सौंदर्य
कवळाया बघतां मेघा सागर-वीची
दे दीप किनाऱ्यावरला बुडत्या धैर्य

: १४८ :

" तव चरणिं वाहिलें हृदयाचें स्वामित्व
दिलदारपणें तरि देसि जगा तव सत्त्व "
" प्रज्ज्वलीत करिसी मन तूं तेजोगर्भे !
श्रद्धाच तुझी कवळिते विश्व-बंधुत्व "

: १४९ :

बेफाम दौडतां ध्येय-रथाचें अश्व
मज गमलें भ्रमते भंवतालींचें विश्व
परतलों जिंकुनी आज अखिल सम्राटा
शांती न लाभुनी क्षितिजाचें स्वामित्व

: १५० :

खदिरांगारासम जळला तो शतवर्ष
तेजास तयाच्या कुणिहि न केला स्पर्श
दीप्तिमान त्याची जळली तनु एकाकी
संघर्षावांचुनि कधिंही नच उत्कर्ष

: १५१ :

भस्मभूत होतां प्रीतींतिल आसक्ती
जीवनांत पाहे डोकावून विरक्ती
व्याकुळला आत्मा निमिष पळाला वांछी
" या देहापासुनि मिळेल कां मज मुक्ती ? "

: १५२ :

घोळवून अधरीं नित थोरांचें बोल
वाढविलें त्यानें रसवंतीचें मोल
अभिरुची वेगळी होति परंतु तयाची
जीमुळें जीवनीं सहजी सुटतो तोल

: १५३ :

पंकांत रुते हा चरण तुझा राजीवा
रवि-प्रतिभा फुलवी तरिही तुझिया जीवा
मानवता न्याया मिळवायास अनंता
कुलशील अभेदें करिति महात्मे सेवा

: १५४ :

जिंकाया जातां अंतरिंच्या आकांक्षा
कां तमा जिवाची माझ्या होइल रक्षा ?
झुंझार, खेळतां प्रतिपक्ष्याशी झुंज
भीरुतेहुनी स्वीकारिल समर विनाशा

: १५५ :

वाणीनें त्याच्या झरत्या आपोआप
दूषीत मनांतिल दूरविलें आक्षेप
कुणि दयिता उठली, वदली "माझे ऐका !"
तो मूर्छित झाला, रुतुनि उरीं दृक्क्षेप

: १५६ :

प्रेयसिची प्रतिमा घेउनि एकांतांत
कुणि प्रियकर रंगे नवतीच्या रंगांत
रसभंग करी रव चुकचुकल्या पालीचा
अपशकुन सूचवित "जळाशिल चिर-विरहांत"

: १५७ :

संपतां निशा ही उघडी पूर्वा द्वार
जागत्या जगाचा करावया उद्धार
तिमिराचें विरतां पाश, उठुनि उत्साहें
कर्तव्य जाहलें नव-किरणांवरि स्वार

: १५८ :

संगमीं तुझ्या जे उठलें स्वप्न-तरंग
फेसाळत होता त्यांतुनि तव अनुराग
जातांना सोडुनि दूर तुला निशि-कांते !
पाहतो लोचनीं इंद्र-धनूचे राग

: १५९ :

कंठिता आपुलें शापित जीवन रुक्ष
तुज बघुनि, पयोदा, हर्षित झाला यक्ष
थबथबला जेथे अंतरिंचा ओलावा
कवळाया उभवी बाहू आर्त हताश

: १६० :

बान्धून आपुल्या काळ-यंत्र मणिबन्धीं
रोधूं न शके कुणि क्षणहि काळ स्वच्छंदी
जो लहरींवरती नाचवि जीवित-नौका
उसळतां तयाला काय किनारा रोधी ?

: १६१ :

" कुणि घेइल हातीं यापुढती मम कार्य ?
अस्तंगत होतां सहजचि वदला सूर्य
सौजन्यें वदली पर्णकुटींतिल पणती
" स्वीकारिन जोंवरि स्नेह अंतरीं, आर्य ! "

: १६२ :

" मम मुठींत राही विश्वाचा संहार "
म्यानांतुनि वदली डौलानें तलवार
परिसुनि हें वदली देव्हाऱ्यांतिल गीता
" मुक्तीस्तव त्याच्या घेइन मी अवतार "

: १६३ :

विरहानें उजळी, सान्निध्यानें जाळी
कळणार कुणा ही अपुली प्रीत निराळी
जग पाही जाती–धर्माचे संबंध
अन् सौभाग्याचा लावी तिलक कपाळीं

: १६४ :

वनवासी झालों जरी कुणाच्या रागें
रंगेल अधिक मम प्रतिभा विरह–तरंगें
शब्द–रूप देतां चंदेरी स्वप्नांस
राहील तुझें दिनरात प्रेम मानें जागें

: १६५ :

जाणिलें अचुक मीं अंतरिंचें तव गूज
ऋणभारें म्हणुनी अवनत काय उरोज
व्यक्तवी मनोगत ललिता सूचकतेनें
प्रेरणेंतून ज्या अमर शाहा-मुमताज

: १६६ :

तरळती तुझ्या अधरींची ज्योत्स्ना-गीतें
मन रमण्या संसारांत, कधीं गुणगुणते
भावार्थ उमगतां चरणांतिल एकाद्या
आकळुनी जीवन तव; मन्मन काहुरतें

: १६७ :

'कवि तुम्हीं दवडितां उगाच काळ अमोल'
बोललें कुणितरी सुटुनि जिभेचा तोल
जाणील केंवि तो, रमला जो व्यवहारीं
होतात उद्यांचे शिलालेख कवि-बोल

: १६८ :

क्षण चार-दोन कधिं मिळतां स्वर्ग-सुधेचे
लावण्य प्रत्यही वाढे गन्धवतीचें
ऋतु संरतां होई सुफला श्याम-लता ती
स्नेहाविण निष्फळ जीवन कामातांचें

अनुक्रमांक १५५६९
विभाग
क्रमांक

: १६९ :

ये कधिंहि न्यावया काळा मद्दह्नातें
झुंझार मना तूं शक्त न जिंकायातें
वट-वृक्ष मुळांतुनि उखळीं वादळ-वारा
येई न खुडाया तया तृणाचें पातें

: १७० :

" निशिदिनीं रहा तूं प्राशित जीवित-सार
नाचवी परी मज नाण्यांचा झंकार "
" तूं जगसी मित्रा केवळ उदरंभरणा
मी जगतां जगविन मूल्यें माझी प्यार "

: १७१ :

सौंदर्य प्राशुनी रात्रंदिन विश्वाचें
वाढविलें वैभव आजवरी आत्म्याचें
उसळतां अंतरीं विचार-वलयें केव्हां
चैतन्य छंद-मय होउनि अधरीं नाचे

: १७२ :

वर्षानुवर्ष जो झाला काल-विनाश
त्यामुळें आज मम होई हृदय हताश
कुणितरी गाइ परि अंतरिंच्या एकान्ती
" केव्हांच वाहिलें हृदय तुला, चल हांस ! "

: १७३ :

विसरुनी जगाचें स्वार्थी अंगउपांग
अपुल्याच विचारीं तुकया झाला दंग
चिंतनीं दिसुनि ये प्रतिभेचा उन्मेष
म्हणुनीच तयाची वाणी अजुनि अभंग

: १७४ :

मी मुग्ध आजवरि स्वरूप मम अज्ञात
गावया गौरवी मजपाशी नच भाट
शारदे ! तरी तव करितां निरलस सेवा
व्यक्तित्व कुणितरी जाणिल काळ अनंत

REFBK-0007474
REFBK-0007474

★

# सागरा

सागरा, विहरतां तुझ्या किनाऱ्यावरती
पाहिली कितीदां सुकती आणिक भरती
अंतर्मुख होउनि खिळलें मानस माझें
क्षितिजांत, दूरच्या विरत्या नौकेवरती

*

चिंतनांत सरतां निमिष-पळें घटकांत
कल्पना रंगल्या सहज भाव-कणिकांत
नादांत उरींच्या लाटा अन लहरींच्या
अस्तित्व विसरलों भवतालिल तिमिरांत

* * *

परि पदन्यास मम तुझिया सिकतेवरले
आदळत्या लाटा-लहरींतुनि जे उरले
कुणितरी मुशाफिर मजसम संचरतांना
पदचाल पाहुनी जगतिल जीवन असलें